


**डॉ. विलास आढाव**
एम.ए.,पीएच.डी.(अर्थशास्त्र),
पुणे विद्यापीठ


अर्थशास्त्र विषयाचा अधिव्याख्याता म्हणून १९९२-१९९३ मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नसरापूर, जि. पुणे येथे काम केले. सन १९९३ पासून विद्यापीठातील प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागात कार्यरत. सध्या **सहयोगी प्राध्यापक** पदावर कार्यरत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे, परिसंवादांमध्ये शोधनिबंधांचे सादरीकरण. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार सेवा विभागात तदर्थ अभ्यास मंडळ सदस्य. पुणे विद्यापीठात **'प्रौढ शिक्षण'** या विषयात पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक. विविध उपक्रमांचे संयोजन केले.

**प्रकाशित पुस्तके :**

- अध्ययनशील समाज : जीवनविषयक उद्बोधक विचार (२००१)
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर : शिक्षण आणि समाजप्रबोधन (२००२)
- विचार वैभव (२००२)
- समाजक्रांतिकारक : राजर्षी शाहू महाराज (२००३)
- Dr. Babasaheb Ambedkar : Education & Globalisation (2004 )
- कृतिशील विचारवंत आणि समाजसुधारक (२००५).

**प्रकाशित लेख :** फुले-आंबेडकरी तसेच पुरोगामी व परिवर्तनवादी चळवळीच्या दृष्टीने प्रबोधनात्मक १५० लेख महाराष्ट्रातील अनेक वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून आणि साप्ताहिकांतून प्रकाशित.


**पुरस्कार :**

- निष्ठावंत कार्यकर्ता पुरस्कार (१९९९), बंधुता प्रतिष्ठान, पुणे.
- शिक्षक पुरस्कार (२०००), पुणे महानगरपालिका, पुणे.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव पुरस्कार (२००१), पुणे.
- गुणवंत कार्यकर्ता पुरस्कार (२००२), सर्वधर्म समभाव सेवा मंच, पुणे, संलग्न नेहरू युवा केंद्र (भारत सरकार).
- महात्मा जोतीबा फुले फेलोशिप सन्मान (२००३), दिल्ली.
- लायन्स आदर्श शिक्षक पुरस्कार (२००६), लायन्स क्लब, फलटण.
- फर्ग्युसोनियन्स अवॉर्ड(२००६), फर्ग्युसन क्लब, पुणे.
- शिक्षारत्न अवॉर्ड (२००७), इंडिया इंटरनॅशनल सोसायटी, नवी दिल्ली.
- ज्यूअल ऑफ् इंडिया अवॉर्ड (२००८), इंडियन सॉलिडॅरिटी कौन्सिल, नवी दिल्ली.

□□

## पुणे विद्यापीठ

# महिला सबलीकरण




**डॉ. विलास आढाव**

**प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग**

**पुणे विद्यापीठ**

## पुणे विद्यापीठ

### प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग

### ध्येय-उद्दिष्टे

**ध्येय :**

उदयोन्मुख ज्ञानाधारित समाजाच्या गरजा भागविणे आणि अध्ययनशील समाजाला शिकण्याच्या संधी पुरविण्याच्या दृष्टीने आजीवन शिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

**उद्दिष्टे :**

- ज्ञान, कौशल्य, माहितीची साधने आणि समाज यांच्यात परस्पर सहकार्य व समन्वय घडवून आणणे.
- ज्ञानविस्तार संकल्पनेचे शैक्षणिकीकरण करणे तसेच शैक्षणिक विभागांना ज्ञानविस्तार कार्यांच्या दिशा देणे.
- जनतेत विशेषत: उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांत सामाजिक व राष्ट्रीय मूल्ये, दृष्टिकोन, कौशल्ये व ज्ञान यांची रुजवणूक-जोपासना करणे.
- ज्ञान आणि इतर संस्थात्मक साधनांच्या देवघेवीतून समाज व उच्च शिक्षणातील दरी कमी करणे.

वास्तव जीवनात बहुसंख्य स्त्रिया अत्यंत कमी वेतन, कमी मजुरी, किमान कौशल्य, उत्पादनाच्या जगात कमी वाव, किमान साक्षरता, कुपोषण, अनारोग्य आणि कुटुंबातील हिंसाचार यांच्या बळी असतात. त्यामुळे स्त्रियांच्या दृष्टीने समानता, समता, न्याय असलेला समाज निर्माण करणे म्हणजे खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या सबलीकरणाचा प्रयत्न करणे. विकासप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग केवळ शाब्दिक आव्हाने करून होणार नाही. तसेच, समानतेची कल्पना यांत्रिक औपचारिकतेतून घडणार नाही याची सर्वप्रथम जाणीव महात्मा जोतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना झाली. त्यांनी त्यांच्या सामाजिक चळवळी आणि उपक्रमांमध्ये स्त्रीप्रश्नांना अग्रस्थान दिले.

*एखाद्या समाजाच्या स्त्रियांच्या प्रगतीवरुन त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. आपण एवढ्या मोठ्या संख्येने आलात यावरुन आपला समाज आता नक्कीच प्रगतीच्या मार्गावर आहे, यात शंका नाही.*

*तुम्ही स्वच्छ राहा, सर्व दुर्गुणांपासून दूर राहा, मुलांना शिकवून महत्त्वाकांक्षी बनवा. मुलांची लग्न करण्याची घाई करू नका. त्यांना स्वत:च्या पायावर उभे होण्याइतपत लायक करा. त्यांचे सहचरी बना. माझा हा सल्ला ध्यानात ठेऊन वागलात तर तुम्ही स्वत:चीही उन्नती कराल आणि समाजाला प्रगतीच्या मार्गावर न्याल.*

**- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

*[ केवळ खाजगी वितरणासाठी ]*

# क्षणचित्रे










**मा. कुलगुरू**
**डॉ. रघुनाथ शेवगांवकर यांचा**
**शुभसंदेश**

पुणे विद्यापीठाची स्थापना ही महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासासाठीची एक अविस्मरणीय घटना आहे. अनेक सामाजिक मूल्यांची रुजवण पुणे विद्यापीठाने आपल्या स्थापनेपासून केली आहे. जागतिक स्तरावर पुणे विद्यापीठाचा एक वैभवशाली व गौरवशाली विद्यापीठ म्हणून ठसा कायमचा आहे. याचबरोबर विद्यापीठाला सामाजिक बांधिलकीचे व समाजऋणाचे भान आहे.

पुणे विद्यापीठाचा प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग याच भावनेतून कार्यरत आहे. समाजातील अनेक घटकांच्या शैक्षणिक व सामाजिक उत्थापनासाठी या विभागाचे विविध उपक्रम सतत चालू आहेत. स्वयंसेवी संस्था, राष्ट्रीय एकात्मता, महिला सबलीकरण, ज्येष्ठ नागरिक, आणि असंघटित कामगार यांसाठी या विभागातील अध्यापकांनी पुस्तकरूपात अध्ययन साहित्य विकसित केले. या साहित्याचा उपयोग विविध चर्चासत्रे, शिबिरे यांतून अध्यापक, कार्यकर्ते यांच्यासाठी संदर्भ साहित्य म्हणून केला जातो. या अध्ययन साहित्याच्या दुसऱ्या आवृत्तीनिमित्त मी प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागास आणि या विभागातील लेखक अध्यापकांना हार्दिक शुभेच्छा देतो.

३१ मार्च, २०१०

**डॉ. रघुनाथ शेवगांवकर**
**कुलगुरू,**
**पुणे विद्यापीठ.**



# प्रस्तावना

विद्यापीठ अनुदान आयोगाने अध्यापन आणि संशोधनाबरोबरच ज्ञानविस्ताराचा केलेला स्वीकार आणि पुणे विद्यापीठाने लोकभाषा आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासाबरोबरच लोकशिक्षणाच्या दृष्टीने सामाजिक बांधिलकीचा धरलेला आग्रह या बाबींतून प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागाचा उदय आणि विकास झालेला आहे, याच भूमिकेतून समाजातील विकासापासून वंचित असलेल्या अनेक घटकांसाठी विभागातर्फे विद्यापीठ आणि महाविद्यालय पातळीवर चर्चासत्रे, कार्यशाळा, शिबिरे, ज्ञानविस्तार व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचबरोबर संशोधन, साहित्यनिर्मिती, माहितीपट, संकलन अशा बाबतींतही विभाग कार्यरत आहे.

विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि प्राध्यापक, विविध सामाजिक व शैक्षणिक संस्था, अभ्यासक, कार्यकर्ते यांच्या सहकार्याने स्वयंसेवी संस्था, राष्ट्रीय एकात्मता, असंघटित कामगार, महिला सबलीकरण, ज्येष्ठ नागरिक, लोकसंख्या शिक्षण हे आणि असे विविध अभिनव उपक्रम आयोजित केले जातात. या विविध कार्यक्रमांसाठी व त्यांतील उपक्रमांसाठी विविध स्तरांवरील अभ्यासक, कार्यकर्ते, विद्यार्थ्यांसाठी आमच्या विभागातील अध्यापकांनी विकसित केलेल्या अध्ययन साहित्याची दुसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे, यासाठी मा. कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगांवकर यांची प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले. तसेच या अध्ययन साहित्याच्या प्रथम आवृत्तीस तत्कालीन कुलगुरू मा. डॉ. नरेंद्र जाधव यांचा शुभसंदेश लाभला होता. या मान्यवरांचे आम्ही आभारी आहोत.

पुणे विद्यापीठ हे विद्यार्थिकेंद्रित असून समाजाभिमुख आहे. सदर साहित्याचे सुज्ञ वाचक स्वागत करतील, असा विश्वास आहे.

३१ मार्च, २०१०


**प्रा. डॉ. धनंजय लोखंडे**
**संचालक व विभागप्रमुख,**
प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग,
पुणे विद्यापीठ.


# क्षणचित्रे



विद्यार्थी, अध्यापक आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्यासाठी
अध्ययन साहित्य

# महिला सबलीकरण

डॉ. विलास आढाव

प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग,
पुणे विद्यापीठ

प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग
पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७

**महिला सबलीकरण**

मुद्रक व प्रकाशक :
**डॉ. माणिक ल. जाधव**
कुलसचिव,
पुणे विद्यापीठ,
पुणे–४११००७

© लेखक

प्रती : १०००

प्रथम आवृत्ती : २००९
द्वितीय आवृत्ती : २०१०

मुद्रण–स्थळ :
पुणे विद्यापीठ मुद्रणालय,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे–४११ ००७.
[ पु.वि.मु.–१०००–४–२०१० (१२७३) ]

# ऋणनिर्देश

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व ख्यातनाम साहित्यिक आणि विचारवंत डॉ. नरेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाने प्रस्तुत अध्ययन साहित्यनिर्मितीस प्रेरणा मिळाली. माजी प्रभारी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ यांनी या अध्ययन साहित्याची द्वितीय आवृत्ती प्रकाशित करण्यासाठी उद्युक्त केले.

पुणे विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू, विज्ञान-तंत्रज्ञानाचे तज्ज्ञ आणि ख्यातनाम संशोधक, विचारवंत डॉ. रघुनाथ शेवगावकर यांच्या प्रेरणेने प्रस्तुत अध्ययन साहित्याची द्वितीय आवृत्ती प्रकाशित होत आहे.

पुणे विद्यापीठ - प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार मंडळाच्या उपसमितीने हे साहित्य प्रकाशित करण्यासाठी उद्युक्त केले. सदर उपसमितीचे सर्व सन्माननीय सदस्य - प्रा. डॉ. दिलीप उके (अध्यक्ष), डॉ. शिवाजीराव मोहिते, डॉ. कैलास सोनवणे, प्रा. डॉ. धनंजय लोखंडे (विद्यमान विभागप्रमुख व सदस्य सचिव), प्रा. तेज निवळीकर यांचे मार्गदर्शन मिळाले.

प्रस्तुत अध्ययन साहित्य तयार करताना या क्षेत्रातील अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर पुणे विद्यापीठ मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. दत्तात्रय कुटे व सेवक, प्रूफ-रीडर श्री. म. द. पाठक तसेच प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सहकारी यांचे सहकार्य लाभले. याशिवाय ज्या व्यक्तींचे आणि संस्थांचे सहकार्य मिळाले, त्यांचे आभार !

**—डॉ. विलास आढाव**

# अनुक्रमणिका

पृष्ठ क्र.

| | | |
|---|---|---|
| १. प्रस्तावना | .. | ०१ |
| २. फुले–आंबेडकरी वारसा आणि त्यांचे स्त्रीप्रश्नांचे आकलन | .. | ०६ |
| ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्ती संदर्भातील कार्य | .. | १२ |
| ४. महिला सबलीकरण आणि समकालीन संदर्भ | .. | २० |
| ५. महिला आणि विकास | .. | २६ |
| ६. संदर्भस्रोत | .. | ३० |


❑❑

# १ प्रस्तावना, व्याख्या व संकल्पना

**प्रस्तावना :**

भारतीय शासनाने २००१ हे वर्ष राष्ट्रीय पातळीवरचे धोरण म्हणून स्त्रियांच्या सबलीकरणाचे वर्ष असे जाहीर केले. १९९४ साली जागतिक लोकसंख्या परिषद कैरोमध्ये भरली होती. सदर परिषदेमध्ये महिलांच्या प्रश्नांसंदर्भात सविस्तर चर्चा केली गेली. त्यामध्ये लोकसंख्येचा प्रश्न स्त्रियांना आपल्या जननदरक्षमतेसंदर्भात नियंत्रण मिळण्याशी म्हणजे त्यांच्या सबलीकरणाशी जोडला आहे, असा एक विचार मांडला गेला. स्त्रियांचे सबलीकरण वा सक्षमीकरण केवळ राजकीय वा आर्थिक क्षेत्रांमधील काही सुधारणांद्वारे साधता येणार नाही, याची जाणीव राज्यकर्त्यांना तसेच खुद्द स्त्री-प्रश्नांचा अभ्यास वा त्या संदर्भात चळवळी करणाऱ्यांनाही आहे. कारण, अनेक बळी जाणाऱ्या गुरांप्रमाणे स्त्रियांचे वास्तव गुंतागुंतीचे असते. स्त्रियाही ह्या प्रक्रियेत 'असाहाय्य' व्हायला 'शिकतात'. कारण, तसे केले म्हणजे त्यांचा बळी जात असल्याची जाणीव बोथट होणे वा टाळणे शक्य होते. परंतु, तऱ्हेची मानसिकता धारण करणाऱ्या स्त्रिया प्रचंड मोठी किंमत देतात.

**महिला सबलीकरण म्हणजे काय ? व्याख्या व संकल्पना :**

सबलीकरण वा सक्षमीकरण ही संकल्पना सत्ता म्हणजे नेमके काय या संकल्पनेशी निगडित आहे. भारत सरकारने सुरुवातीला नियोजनबद्ध विकासाचा विचार करताना भारतातील स्त्रियांचा प्रश्न, विचार, स्त्रिया आणि मुले या चौकटीत अधिक प्रमाणात केला. दक्षिण आशियाई देशांत स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या तुलनेत एकूणच खालावलेला आहे हे लक्षात घेऊन स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटनेमध्ये तसेच कायद्याच्या चौकटीत स्त्रियांना समान स्थान देण्याचे पाऊल उचलले गेले. परंतु, विविध पंचवार्षिक योजनांचा आढावा घेताना मात्र लक्षात आले की, प्रत्यक्ष जीवनात बहुसंख्य स्त्रिया अत्यंत कमी वेतन, कमी मजुरी, किमान कौशल्य, उत्पादनाच्या जगात कमी वाव, किमान साक्षरता, कुपोषण, अनारोग्य आणि कुटुंबातील हिंसाचार यांच्या बळी असतात. त्यामुळे स्त्रियांच्या दृष्टीने समानता, समता, न्याय असलेला समाज निर्माण करणे म्हणजे खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या

सबलीकरणाचा प्रयत्न करणे. विकासप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग केवळ शाब्दिक आव्हाने करून होणार नाही. तसेच, समानतेची कल्पना यांत्रिक औपचारिकतेतून घडणार नाही याची जाणीव झाली. तेव्हाच नव्या अर्थव्यवस्थेच्या टप्प्यावर सबलीकरण वा सक्षमीकरण ही संकल्पना मांडण्यास सुरुवात झाली.

तसे पाहिले तर, सबलीकरण ही संकल्पना प्रथम १९६० साली अमेरिकेतील काळ्या, जहाल गटांनी मांडली. सबलीकरण म्हणजे नेमके काय आणि स्त्रियांचे सबलीकरण कसे घडणार यांवर अनेक मतमतांतरे आहेत. परंतु, भारतीय संदर्भात असे म्हणता येईल की, आर्थिक, सामाजिक दृष्ट्या केल्या जाणाऱ्या सुधारणांमधून स्त्री-पुरुषांमध्ये व्यक्ती, समाज, समूह वा जातजमात म्हणून 'स्त्रियांच्या दृष्टीने' परिवर्तन होणे ही सबलीकरणाची अट आहे. 'स्त्री नावाचा भारतीय समाजातील जो घटक आहे त्याला आपल्या जीवनात सर्व क्षेत्रांत आपल्या सुप्त क्षमता प्रत्यक्ष वापरता येतील असा समाज निर्माण करणे म्हणजे सबलीकरण' अशी व्याख्या करता येईल.

स्त्रिया आणि पुरुष आपल्या स्वत्वाबद्दल ज्या कल्पना घेऊन दैनंदिन विकासाच्या कामांत येतात, त्या संदर्भात मूलभूत प्रश्न उभे करणे सबलीकरणाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे ठरते. उदा., आपले अस्तित्व, स्त्रीत्व वा पौरुष कशामुळे सार्थ ठरते, आपल्याला माणूस म्हणून कशामुळे प्रतिष्ठा मिळते, या सर्वांमध्ये सबलीकरणाच्या प्रक्रियेबद्दल होणारे बदल होणे अपेक्षित आहेत. कुटुंबे, घरे-दारे आणि भोवतीची समाजव्यवस्था यांमध्ये खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण, लोकशाही मूल्यांची जोपासना व्हायची, तर भारतातील स्त्रियांना प्रौढ, समजदार होण्यासाठी वाव निर्माण झाला पाहिजे असा सबलीकरणाच्या संकल्पनेचा आग्रह आहे.

गरिबीत आयुष्य काढणाऱ्या अनेक स्त्रिया स्वत:च्या प्रयत्नांनी स्वत:चा विकास साधताना दिसतात. काही काळ विकासाच्या संदर्भात स्त्रिया नावाच्या घटकाला पूर्णत: सत्ताहीन, शक्तिहीन मानले गेले होते. त्याला शह देण्यासाठी सबलीकरणाची संकल्पना उदयाला आली असे दिसते. अगदी किमान सत्ता असलेल्या गरीब घरांतील स्त्रियांचे झगडणे वा प्रतिकार पाहिल्यानंतर आपल्या आयुष्यात, आपल्या परिस्थितीत केवळ बळी जाणे

होता कामा नये, ही सबलीकरणाची प्रतिज्ञा सर्व स्त्रियांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. स्त्रिया पूर्णत: सत्ताहीन कधीही नसतात. तशा त्या 'बनविल्या' जातात, असे त्यातून ध्वनित होते. सत्ता म्हणजे नेमके काय हे सांगणे कठीण असले तरी ती सर्वदूर पसरलेली प्रवाही, समाजाच्या सर्व घटकांमध्ये असते, हे लक्षात घेतले तर भौतिक संसाधने जितकी महत्त्वाची तितकेच सत्तेचे नियम ठरविण्यामध्ये सहभाग असणे हेही महत्त्वाचे आहे. सगळ्यात कळीचा मुद्दा असा आहे की, जे समज आणि मूल्ये घेऊन आजवर स्त्री-पुरुष जगत होते, त्यांतून स्त्री-पुरुषांमध्ये उतरंडीची, सत्तासंबंधीची रचना नैसर्गिक म्हणून गृहीत धरली होती. त्यांमध्ये खऱ्या सबलीकरणातून आता परिवर्तन होणे अटळ आहे. कारण, एकाकी सामर्थ्य गाजविणारे 'पौरुष' अथवा केवळ संगोपन, संवर्धक, त्यागी 'स्त्रीत्व' या दोन्हींमधून स्त्री-पुरुषांच्या निर्मितिक्षमतेवर, सामर्थ्यावर मर्यादा आल्या होत्या. त्या दूर करून आपापल्या आयुष्यात कर्तेपणा येऊन माणूस म्हणून समग्रतेने जगण्याची क्षमता धारण करणे म्हणजे सबलीकरण होय, असे स्त्रीप्रश्नांचे अभ्यासक मानतात.

सबलीकरणाचा विचार घेऊन शिक्षण, साक्षरता, आरोग्य, पोषण, प्रशिक्षण, रोजगार, कायदेविषयक सुधारणा अशा सर्व क्षेत्रांत कार्यक्रम वा योजना राबविताना राज्यकर्त्यांचा जो निश्चय आहे तो महत्त्वाचा आहे. परंतु, हे राबविताना अभ्यासकांच्या मते, पुढील मुद्दे लक्षात घेतले पाहिजेत :

१. स्त्रिया परिवर्तनाच्या केवळ 'लाभधारक' नसतात तर 'वाहक'ही असतात, म्हणून त्यांचे वास्तव आणि विशिष्ट गरजा लक्षात घेऊन योजना आखल्या गेल्या पाहिजेत. सर्वसाधारणत:, घरांमध्ये स्त्रियांची कमाई मूलभूत गरजा भागविण्यासाठी वापरली जाते. परंतु, संपत्तीवरील खरा अधिकार मात्र घरातील पुरुषांकडे असतो, हे लक्षात घ्यावे लागेल.

२. स्त्रियांचे जात, वर्ग, धर्म यांपलीकडे जाऊन गट निर्माण करणे अत्यंत आवश्यक परंतु, जिकिरीचे काम आहे. स्त्रियांमध्ये भगिनीभाव निर्माण झाला तर दारूबंदी, नशाबंदी बचतगट वा निवारा योजना यांसारख्या कामांत समविचारांच्या पायांवर स्त्रिया एकत्र येऊ शकतात. हे अनेक स्वयंसेवी संघटनांच्या कामांतून सिद्ध झाले आहे. म्हणून, शासकीय

योजना स्वयंसेवी संघटनांच्या साहाय्याने संवाद साधत राबविल्या गेल्या पाहिजेत.

३. प्रबोधनाच्या पातळीवर स्त्रियांच्या समान दर्जाचा प्रश्न अत्यंत संवेदनक्षम पद्धतीने परंतु, ठामपणे मांडला गेला पाहिजे. स्त्रिया मुळातच सबला असतात अगर अबला असतात, अशा चुकीच्या भूमिका न घेता जात, वर्ग, धर्म यांप्रमाणेच स्त्री-पुरुष विषमता समाजामध्ये घडविली जाते. त्यात नैसर्गिक असे काही नसते यावर भर दिला गेला पाहिजे.

४. कष्टकरी स्त्रीला सक्षम होण्यासाठी काही किमान सोयीसुविधा आवश्यक आहेत. येथे कष्टकरी हा शब्द घराबाहेर पडून पूर्णवेळ काम करणाऱ्या सर्व स्त्रियांच्या दृष्टीने वापरला आहे. स्वस्त, स्वच्छ, सकस उपाहारगृहे, सुरक्षित पाळणाघरे, घरातील वृद्ध व्यक्तींची काळजी घेणारे पण त्यात सामूहिकता, सामाजिकता टिकविणारे वृद्धाश्रम अशा नव्या सोयी आपल्या समाजात अतिआवश्यक आहेत.

५. विशेषत:, तरुण मुली आणि बालिका यांच्यासाठी भरीव प्रयत्न होणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे स्त्रिया कुटुंबात जेव्हा कर्त्या होतात, तेव्हा त्याचा चांगला परिणाम कुटुंबातील सकस आहार आणि आरोग्य यांवर होतो, त्याप्रमाणे बालिका आणि तरुण मुली यांना निर्भय वाटेल असे वातावरण प्रत्येक झोपडीमध्ये, वसाहतीमध्ये, अगदी एकीकडे निर्जन रस्त्यावरही झाले पाहिजे. बेरोजगार, चेहरे हरवलेल्या, तथाकथित शूरवीर तरुणांच्या टोळ्या गुंडगिरी करत फिरत राहिल्या तर स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे, सबलीकरणाचे सर्व प्रयत्न फोल ठरतील.

६. बांगला देशातील ग्रामीण बँकेचा प्रयोग किंवा भारतातील अहमदाबाद येथे स्त्रियांसाठी 'स्वयंरोजगार' निर्माण करण्याचा प्रयत्न असे प्रयोग तसेच राजस्थानातील 'साथीन' योजना आणि त्यातून संघटित झालेल्या भूमिहीन मजूर स्त्रिया, तसेच काच, पत्रा गोळा करणाऱ्या स्त्रियांची संघटना वा मोलकरीण संघटनाही सर्व सबलीकरणाची काही सकारात्मक उद्दिष्टे आहेत. परंतु, तरीही हे आंशिक प्रयत्न आहेत. कारण, त्याचे सार्वत्रीकरण यातून झाले नाही.

थोडक्यात, आताच्या घडीला आपल्याला स्त्रियांच्या जीवनाच्या गुंतागुंतीचे भान ठेवून सबलीकरण प्रत्यक्षात आणावे लागेल. बचत गटांतून स्त्रियांनी केलेली बचत त्यांच्या वार्धक्यासाठी वापरली जाणे महत्त्वाचे आहे. तसेच, कष्टकरी स्त्रीला हक्काची विश्रांती, सांस्कृतिक जीवन जगण्याचा हक्क, कलात्मक आविष्कारांसाठी वाव हेही सारे मिळालेच पाहिजे. भारतीय स्त्रियांनी आत्मप्रतिमा, आत्मविश्वास वाढवायचा झाला तर भारतातील विविधता, भिन्नता आणि तरी एकोपा या साऱ्यांचा सबलीकरणाच्या संदर्भात गंभीरपणे विचार केला पाहिजे. स्त्रियांसाठी साधी सुरक्षित स्वच्छतागृहेही मोठ्या शहरांमध्ये अभावनेच आढळतात. तसेच, आपापल्या गटांचे समुदायांच्या अस्मितांचे प्रतीक म्हणूनही स्त्रियांचा वापर केला जातो. हे लक्षात घेऊन सबलीकरणातून स्त्रियांचे 'बाईपणाच्या असणाऱ्या समान दडपणुकीबद्दलचे भान' या सबलीकरणातून जागे झाले तर आपण एकविसाव्या शतकाच्या नव्या भारताच्या संदर्भात सबलीकरणाचा विचार करताना इतिहासातील फुले-आंबेडकरी परंपरेचा मागोवा घेणे गरजेचे ठरते. आव्हानांना तोंड देऊ शकू, असा विश्वास वाटतो.

❑❑

# २ फुले–आंबेडकरी वारसा आणि त्यांचे स्त्रीप्रश्नांचे आकलन

भारतातील स्त्री सबलीकरणाचा विचार करताना वेगवगळ्या टप्प्यावर स्त्री शोषण शासनावर आवाज उठवलेल्या आणि त्याचे विश्लेषण करणाऱ्या सुधारक/क्रांतिकारक स्त्रिया, त्यांना झालेला विरोध आणि महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांनी त्यांना दिलेला पाठिंबा यांचा आढावा महत्त्वाचा आहे. त्यांनी स्त्री आणि जातीय प्रश्नांचे केलेले विश्लेषणही महत्त्वाचे आहे. पंडिता रमाबाईंचे धर्मांतर आणि ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक, यांवर ब्राह्मणवादी ब्राह्मण, सुधारक ब्राह्मण आणि सत्यशोधक चळवळीतीलही काही प्रमुख कार्यकर्ते यांनी टीका केल्यावर त्यांच्यावर झोड उठविणारे लिखाण म. जोतीबांनी 'सत्सार' अंक १ आणि 'सत्सार' अंक २ मध्ये केले. स्त्री-मुक्ती विचाराची जास्त स्पष्ट आणि रोखठोक बाजू त्यांनी त्या वेळी मांडली. स्त्रियांना कसे शूद्राप्रमाणेच दीन आणि गुलाम केले गेले आहे. केवळ ब्राह्मणांकडून नाही तर सर्वच जातींच्या पुरुषांकडून हा अन्याय चालू आहे, अशी भूमिका म. फुले यांनी मांडली आहे. अगदी सरळ उघड परखडपणे स्त्रियांच्या स्वातंत्र्याची बाजू अशा प्रकारे प्रथम त्यांनीच घेतली. ही भूमिका भूतदयावादी किंवा सतीप्रथेसारख्या काही अन्याय, अमानुष चाली बंद करण्याच्या भूमिका घेण्यापुरती सुधारणावादी नव्हती. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, त्यांची गुलामी संपली पाहिजे, असे आग्रहीपणे सांगणारी म. फुले यांची क्रांतिकारक भूमिका होती.

''विदर्भ आर्य ग्रंथकारांनी स्त्रियांविषयी केलेल्या जुलमी लेखांविषयी... लिहू गेल्यास... आर्य ग्रंथकारांच्या पुस्तकातील कृत्रिम लबाड्या भट ब्राह्मणांच्या लेकीबाळींच्या लक्षात आल्याबरोबर त्या एकंदर सर्व देवळांतील पुराणिकांची फटफजिती करून त्यांची रेवडी करून सोडतील...'' असे 'सत्सार' अंक २ मध्ये म. फुले म्हणतात. स्त्रियांना अज्ञान आणि गुलाम ठेवण्याचा इतिहास जर उलगडून दाखविला तर स्त्रिया कशा प्रकारे चळवळ करतील याची कल्पना त्यांनी अशा प्रकारे मांडली आहे.

इतिहासात पुरुष कसे स्त्रियांपेक्षा 'अधिक दगेबाज, ठक, साहसी, क्रूर व नवीन जास्ती भयंकर, धाडसी दुष्ट कर्मे आचरणारे आहेत...' याविषयी याच 'सत्सार' मध्ये म. फुले यांनी मांडले आहे. ब्राह्मण ग्रंथामध्ये आणि ज्ञात इतिहासात (जगाच्या आणि भारताच्या) शोधल्यास पुढील मुद्दे स्पष्ट होतात असे म. फुले यांचे म्हणणे आहे :

* पुरुष, लग्नाची एक आवडेनाशी झाली तर दुसरी, मग तिसरी, चौथी अशा बायका करून स्त्रियांवर अत्याचार करतात. त्याप्रमाणे स्त्रियांनी नवरा दुर्वर्तनी निपजल्यासदेखील दुसरा नवरा करून त्याच घरात प्रपंच करावा, असे आर्यपुरुषांनी केलेल्या ग्रंथात कोठे लेख सापडत नाहीत, असे ते म्हणतात. यावरून पुरुष जास्त पक्षपाती आणि दगाबाज असतात.
* पुरुषांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या बाहेरख्यालीपणाचे वर्णन करून ते म्हणतात की, स्त्रिया असा प्रकार करीत नाहीत म्हणून पुरुष जास्त वाईट आहेत, ठक आहेत. परंतु स्त्रियांपैकी कोणीतरी एका ठिकाणी जमून एखादा जवान, देखणा, मृगनयनी, धष्टपुष्ट, मर्द, कसबी गवई आपल्यासमोर इश्की गाणी गावयास लावून, त्याने गातागाता आपले हाताचे हावभाव करून; आपल्या अंत:करणात घायाळ होऊन त्या छबिन्या गवयाच्या मांडीवर आळीपाळीने बसून त्याच्याबरोबर पुरुषांप्रमाणे ख्याल तमाशे करतात काय?
* मानवबांधवांचे देश काबीज करण्याकरिता जी अनेक युद्धे होत आली आहेत ती सगळी पुरुषांनी केली आहेत. हाताच्या बोटांवर मोजण्याइतपत तुरळक उदाहरणे सोडता, गेल्या काही हजार वर्षांच्या इतिहासात झालेल्या अनेक युद्धांचे सरसेनापतीपण पुरुषांनीच केले आहे. युद्धांमुळे हजारो पुरुषांची कत्तल होते, उत्पादक जीवन उद्ध्वस्त होते, चोहोकडे काळोखमय, दु:खाचे धुळे पसरते, संसार उद्ध्वस्त होतात, स्त्रियांना सर्वांत जास्त दु:ख आणि त्रास भोगावा लागतो. ही युद्धे म्हणजे पुरुषांच्या साहसी, क्रूरपणाचा प्रचंड मोठा पुरावा आहे.

* युरोप आणि अमेरिका खंडांतील, ब्राह्मणांसारखा आपल्या धर्माचा बाणा बाळगणाऱ्या पुरुषांनी आफ्रिका खंडातील स्त्री-पुरुषांना कसे गुलाम केले, पशुपक्ष्यांप्रमाणे त्यांची खरेदी-विक्री केली याचे विदारक उदाहरण म. फुले यांनी घेतले आहे. अंकल टॉम्स क्याबीन या त्या काळातील अमेरिकन स्त्रीने लिहिलेल्या पुस्तकाचा ते दाखला देतात आणि सर्व पुरुषांचा क्रूरपणा यातून बाहेर येतो, असा निष्कर्ष काढतात.

* पुरुषांच्या क्रूरपणाचे स्त्रियांना भोगावे लागणारे सर्वांत भयंकर उदाहरण म्हणून ते सतीप्रथेचे उदाहरण घेतात. निश्चय म्हणून त्या काळच्या ब्राह्मण स्त्रीला जगाव्या लागणाऱ्या यातनामय जीवनाचे वर्णन करतात. अशी वागणूक पुरुषांना स्त्रियांनी दिल्याचा इतिहास नाही.

या सर्व मांडणीतून म. फुले यांनी भौतिकवादी इतिहासलेखनात स्त्री-मुक्तिवादी दृष्टिकोन घेतला आहे, असे आपल्याला म्हणावे लागेल. इतिहासात आर्थिक शोषण, मग ते वर्गीय असो नाही तर जातीय व्यवस्थापक असो, अशा प्रकारे होत आले याचा शोध घेऊन जशी मांडणी केली पाहिजे तशी पितृसत्ताक पुरुषप्रधान व्यवस्थेतून होणाऱ्या शोषणाचा शोध घेणारी मांडणी असली पाहिजे, अशीच ही भूमिका सांगत आहे. त्याबरोबर शासन, सत्ता, गुलामगिरी आणि त्यांतून येणारी युद्धखोरी, हिंसाचार याचा संबंध पुरुषप्रधानता आणि पितृसत्ताक व्यवस्थेशी असल्याचे ते जोरदारपणे निदर्शनाला आणतात. म. फुले यांचे हे योगदान त्यांच्या काळाच्या मर्यादा ओलांडून एका सार्वत्रिक सत्याची मांडणी करणारे आहे. शोषण-शासनावर आधारित सर्व समाजव्यवस्था या पुरुषप्रधान पितृसत्ताक असणारच हे ते सत्य आहे म्हणजेच शोषणविरहित, शासनविरहित समाज हा पुरुषप्रधानतेचा, पितृसत्ताक अंत केल्याशिवाय येऊ शकत नाही असा महत्त्वाचा सिद्धान्त त्यांच्या मांडणीमध्ये लपलेला आहे. केवळ वर्गीय आणि जातीय शोषणाचा अंत करून शासनसत्तेचे जोखड विलयाला जाईल हे चुकीचे असल्याचे यातून स्पष्ट होते

'शेतकऱ्यांचा आसूड' या पुस्तकात ते शासनशोषणविरहित आणि पुरुषप्रधान, पितृसत्ताक व्यवस्था प्रस्थापित न झालेल्या साम्यवादी समाजाची मांडणी करतात, लोकसत्ताक राज्याची मांडणी ते करतात. या राज्यांपासून

राजांनी शासन केलेल्या राज्यांकडे संक्रमण झाल्याचे वर्णन ते करतात. राजेशाहीचा उदय धाडस, पुंड आणि दरोडेखोरांमधून झाला असल्याची भूमिका त्यांच्या लिखाणातून पुढे येते. एकदा शासनसत्तेचा उदय हिंसाचार आणि लुटीचे कायदेशीरीकरण करण्यातूनच झाला आणि या प्रक्रियेत पुरुषांनी पुढाकार घेतला की त्यातून पुरुषप्रधानता, पितृसत्ताकतेला सुरुवात झाली असा त्यांच्या एकंदर लिखाणातून निष्कर्ष निघतो.

अखंडादी काव्यरचनांमध्ये 'कुळंबीण' या मथळ्याखालील अखंडात म. फुले म्हणतात, कूणबारा म्हणजे स्वत: कष्ट करून शेती करणाऱ्या स्त्रियांच्या जीवनाचे चित्र यातून उभे केले आहे. हे चित्र उभे करणारे नऊ अखंड, लिहिल्यानंतर ते ब्राह्मण स्त्रीच्या या उत्पादक जीवनाशी असलेल्या नकारात्मक संबंधाचे चित्र उभे करतात. तेराव्या अखंडातदेखील त्यांनी या संदर्भात सविस्तर वर्णन केलेले आहे.

स्त्री-मुक्तिवादी दृष्टिकोनातून भौतिकवादी इतिहासाकडे पाहताना म. फुले एका बाजूला कष्टाचे जीवन न जगणाऱ्या उत्पादनप्रक्रियेत (घरकामांव्यतिरिक्त) भाग न घेणाऱ्या ब्राह्मण स्त्रियांच्या पुरुषांकडून घेणाऱ्या शोषणाची नोंद घेतात. ते संपविण्यासाठी कृती करण्याची आवश्यकता मांडतात. त्यासाठी स्वत: कृती करतात. पण त्याच वेळी सामाजिक पातळीवर उत्पादन करण्यासाठी राबणाऱ्या, कुळंबीण म्हणून ब्राह्मणांकडून हिणवल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या जीवनात आणि शोषक जातीचा भाग असलेल्या ऐतोबा ब्राह्मण स्त्रियांच्या जीवनात किती जमीन-अस्मानाचा फरक आहे हे ढळढळीतपणे पुढे आणतात. स्त्रियांच्या शोषणाच्या इतिहासाचा शोध घेताना राबणाऱ्या या विभागामधल्या, जातीमधल्या स्त्रिया, दडपलेल्या शोषित जातीतील स्त्रिया आणि वरकड उत्पन्नावर चाळे करू शकणाऱ्या, सामाजिक उत्पादनात न राबवणाऱ्या, वरिष्ठ आणि शोषक जातीमधल्या स्त्रिया यांच्यामधील अंतर्विरोधाची नोंद घेतली पाहिजे. अशीच भूमिका यांतून पुढे येते. स्त्रिया आणि जीवनाच्या काही अंगांमध्ये स्त्री म्हणून लैंगिक शोषण होणाऱ्या पण आर्थिक, सामाजिक शोषणाचे फायदे भोगणाऱ्या स्त्रिया यांच्यामधला हा अंतर्विरोध आहे. अशा या ब्राह्मणी स्त्रिया त्यांच्या स्त्री म्हणून होणाऱ्या शोषणाच्या अंतासाठी उभ्या राहायच्या असतील तर त्यांना ब्राह्मणांविरुद्ध, जातिव्यवस्थेविरुद्ध, आर्थिक शोषणाविरुद्ध सामाजिक दडपणुकीच्या एकूण

व्यवस्थेविरुद्ध राबणाऱ्या स्त्रियांच्या साथीला उभे राहावे लागेल असा या दृष्टिकोनाचा अर्थ आहे.

इतिहासाचा शोध घेताना, इतिहासाचे लेखन करताना हा दृष्टिकोन नसेल तर इतिहास घडवायचा आहे त्यासाठी आणि होणाऱ्या संघर्षामध्ये अक्षम्य चुका राहू शकतात. स्त्रियांच्या आणि एकूणच स्त्रियांच्या शोषणाच्या अंतासाठी चळवळ संघटित करताना या दृष्टिकोनातून क्रांतिकारक विचारांना आधार मिळतो. वर्गीय, जातीय आणि लैंगिक अशा तिहेरी मूलभूत शोषणांचा अंत करणारी चळवळ संघटित करताना स्त्रीमुक्तीचा लढा कसा उभारावा लागेल याचे सूत्र मिळते. सर्व स्त्रिया स्त्री म्हणून शोषित आहेत. पण यांपैकी शोषक कर्त्यातल्या-जातीतल्या स्त्रिया कष्टकरी वर्ग जाती विभागातल्या स्त्रियांबरोबर इतर दोन शोषणांचा अंत करण्याच्या लढाईत उतरल्याच पाहिजेत. तरच त्यांचे स्त्री म्हणून होणारे शोषण संपेल, हे ते सूत्र आहे.

स्त्रीमुक्ती चळवळ उभारताना इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन नसेल तर केवळ जातिव्यवस्था अंताच्या पायावर संघटना बांधण्याचे प्रयत्न होतात आणि स्त्रीमुक्ती चळवळीला घातक ठरतात. एकूण शोषणमुक्तीच्या चळवळीला अडथळा बनतात. इतिहासाचा शोध घेताना अशा तिहेरी शोषणाची सांगड तपासली पाहिजे आणि त्यांचे मूळ शोधून ते उखडण्याचा प्रयत्न, मार्ग काढला पाहिजे. त्याचबरोबर प्रत्येक प्रकारच्या शोषणाचे स्वायत्त स्वरूप कसे आहे याचे विश्लेषण केले पाहिजे असे सांगणारा दृष्टिकोन म. फुले यांनी याबाबतीत मांडला आहे असे म्हणता येईल.

'आपणा सर्वांचे ती सतत रात्रंदिवस नऊ महिने उदरी ओझे वागवित असता तिजला कोणत्याच लोभी पुरुषांसारखे छक्केपंजे करून धाडसपणा करता येत नाही. यावरूनच स्त्रियांना अबला असे म्हणतात.' असे फुलेंनी 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात मांडले आहे. या ठिकाणी अबला या शब्दाचा छक्केपंजे, कावेबाजी, हिंसाचार, पुंडपणा न करणारी व्यक्ती असा अर्थ म. फुले यांनी लावला आहे असे दिसते आणि या चांगुलपणाचा संबंध नऊ महिने गर्भापोटी बाळगण्याशी आहे, असा त्यांनी त्याचा अर्थ जोडला आहे. मानवी पुनरुत्पादनाशी कोणत्या प्रकारचे नाते आहे, सर्व प्राण्यांच्या पिल्लांपेक्षा जास्त अपंग असणाऱ्या मानवी पिल्लाच्या संगोपनाशी नाते कसे

आहे, यावरून स्त्रिया आणि पुरुष यांच्यातल्या संबंधाचा इतिहास, त्यांची त्याबाबतची जागृती ठरते, असा याचा अर्थ आहे. त्या आधारावर म. फुले म्हणतात ''यावरून एकंदर संपूर्ण जगात प्रथम पुरुषांच्या अत्यंत लोभामुळे हेवा, द्वेष, कृत्रिमता, वगैरे नाना प्रकारचे दुर्गुण उत्पन्न होऊन सर्व प्रकारची पातके उदयास आली.''

मानवी समाजाच्या वंश म्हणून होणाऱ्या पुनरुत्पादनात स्त्री-पुरुषांचा सहभाग कशा प्रकारचा आहे, त्यामुळे त्यांचे कोणत्या प्रकारचे लैंगिक संबंध तयार होतात, त्यातून त्यांची जागृती कशा प्रकारची तयार होते, याचा शोध घेतला पाहिजे. इतिहासाकडे बघण्याचा हा दृष्टिकोनही क्रांतिकारक परिवर्तनाला आणि भौतिकवादी इतिहासलेखनाला मोठेच योगदान देणारा आहे.

❑❑

# ३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्ती संदर्भातील कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांकरिता आपले केंद्रीय मंत्रिपद त्यागण्याचा भारताच्या संसदीय इतिहासातील एकमेव प्रसंग वा त्यांचा नायक विसरला गेला आहे. स्त्रीमुक्तीच्या विचारव्यवहारासंदर्भात म. फुले यांच्या क्रांतिकारी विचारांचा वसा आणि वारसा घेऊन म. फुले यांचा स्त्रीमुक्ती चळवळीचा वारसा अविरतपणे आपल्या हयातीमध्ये सातत्याने चालू ठेवला. 'अस्पृश्य मूळचे कोण?' 'शूद्र पूर्वी कोण होते?' 'राम-कृष्णाचे गौडबंगाल', 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' या त्यांच्या इतिहासलेखनांच्या प्रयत्नांतून साकारलेल्या संहिता आहेत.

भारताच्या संस्कृतीच्या एकजिनसीपणाची भारतीय संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फेटाळून लावली. भारतीय समाज हा परस्परविरोधी हितसंबंधांच्या टकरावातून विकसित झाला असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. हा टकराव सांस्कृतिक स्वरूपात, धार्मिक स्वरूपात व्यक्त झाल्याचे निदान त्यांनी केले. इतिहास म्हणजे 'राजघराण्याचा इतिहास' ही इतिहासाची पोकळ सरंजामी समजूतही त्यांनी धुडकावली आणि ब्राह्मणी छावणीच्या विजयाने शूद्र आणि स्त्रियांच्या अवनतीच्या उदयात आणि जडणघडणीत स्त्रीदास्याचा उगम असल्याचे स्पष्ट प्रतिपादन करतात.

बाबासाहेब म्हणतात ''सर्वसामान्यपणे असे समजले जाते की, भारताची संस्कृती इतिहासकाळात फक्त एकच एक समान होती - ब्राह्मण धर्म, बौद्ध धर्म, जैन धर्म या फक्त संस्कृतीच्या वेगवेगळ्या अवस्था होत्या. त्यांच्यात मूलभूत विरोध कधीच नव्हता, असे समजले जाते. दुसरी गैरसमजूत अशी आहे की, भारतीय इतिहासात जे संघर्ष झाले, ते सर्व राजकीय आणि राजघराण्यातील संघर्ष होते. त्यांचा सामाजिक वा सांस्कृतिक जीवनाशी काहीही संबंध नव्हता. या अगदी चुकीच्या कल्पनांपुढे भारतीय इतिहास हा पूर्णपणे यांत्रिक बनला. तो एक राजघराण्यानंतर दुसरे राजघराण्याने आणि एका राजानंतर दुसरा राजा या स्वरूपात लिहिला गेला. ही इतिहासलेखनाची प्रवृत्ती सुधारावयाची असेल तर प्रथम दोन निर्विवाद सत्ये स्वीकारावी लागतील.

पहिली गोष्ट ही की, भारतात कोणतीही एकच एक समान संस्कृती कधीच नव्हती. ऐतिहासिक दृष्ट्या तीन भारत होते. पहिला ब्राह्मणशाही भारत, दुसरा बौद्ध धर्मीय भारत व तिसरा हिंदू भारत, या प्रत्येकाची स्वत:शी अशी संस्कृती होती. दुसरी गोष्ट अशी की, भारतातील मुस्लीम आक्रमणापूर्वी ब्राह्मणशाही व बौद्ध धर्म यांत मरेपर्यंत तीव्र असा संघर्ष झाला होता. जो या दोन गोष्टी लक्षात घेणार नाही. त्यांना या इतिहासात अंतर्भूत असलेला अर्थ व कार्यकारणभाव समजणार नाही. आतापर्यंत भारताचा इतिहास ज्या प्रकारे लिहिला गेला, त्या सुधारणा करण्याच्या आणि इतिहासाचा अर्थ व उद्दिष्टे समजून देण्याच्या दृष्टीनेच ब्राह्मणशाहीच्या बौद्ध धर्मावरील आक्रमणाच्या व ब्राह्मणशाहीच्या बौद्ध धर्मावरील राजकीय विजयाच्या या इतिहासाची मला पुनर्रचना करणे भाग पडले.''

त्यामुळे पुण्यमित्राची क्रांती ही ब्राह्मणांनी बौद्ध धर्माचा पराभव करण्यासाठी केलेली राजकीय क्रांती होती हे मान्य करावे लागेल. भारतीय इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास असल्याचे प्रतिपादन अपुरे असल्याचे स्पष्ट करून भारताचा इतिहास ब्राह्मण-ब्राह्मणेतरांच्या जातिसंघर्षाचा इतिहास असल्याचे नवे सूत्र बाबासाहेबांनी दिले.

## कुटुंब, जातिव्यवस्था आणि स्त्रिया

युरोपीय इतिहासलेखनाच्या प्रभावाखाली भारतीय समाजातील पायाभूत घटक म्हणून पोटजातीचा निर्देश अनेक अभ्यासकांनी केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे म्हणणे अमान्य केले. ते म्हणतात की, भारतीय समाजाचा एकसंघ घटक पोटजात हा नसून गटबाह्य विवाहाच्या तत्त्वावर तयार झालेले कूळ हाच भारतीय समाजातील एकसंघ घटक होय. यावरून असे दिसून येते की, हिंदू समाजाचे संघटन अजूनही प्राचीन गटपद्धतीवरच आधारलेले असून कुटुंब हा त्याचा लहानात लहान घटक आहे आणि गटबाह्य विवाहाचा नियम असून ही कळ व गोत्राच्या आधारावर पाळण्यात येतो. जाती आणि पोटजाती या संस्था सामाजिक असून कुटुंबप्रधान हिंदू समाजरचनेवर मागाहून लादण्यात आल्या आहेत आणि गोत्रबाह्य विवाहाचा नियम पाळून जात्यंतर्गत विवाह करण्याचा नियम करण्यात आला असल्यामुळे या दोन परस्परविरोधी नियमांचे पालन परस्पर बाधा न आणता करता येतो. पोटजात ही भारतीय समाजाचा मूलभूत घटक

नसून कुटुंब हा मूळ घटक आहे. (संदर्भ : डॉ. आंबेडकर 'अस्पृश्य मूळचे कोण?' पृष्ठ क्र. ८८-८९ )

## स्त्रिया आणि जातीची निर्मिती

डॉ. केतकरांनी जातिसंस्थेची जी व्याख्या केली होती ती डॉ. बाबासाहेबांना मान्य आहे. डॉ. केतकरांनी जातिव्यवस्थेची लक्षणे म्हणून (अ) जातिबाह्य विवाहबंदी, (ब) जातीत जन्मलेल्यांनाच सदस्यत्व ही सांगितली होती. डॉ. आंबेडकरांच्या मते ही दोन्ही लक्षणे परस्परांहून वेगळी नसून जातिबाह्य विवाहबंदी घातल्यानंतर परिणामत: सदस्यत्व जातीत जन्मणाऱ्यांपुरतेच मर्यादित होते. जात्यंतर्गत विवाह हा जातीचा आत्मा आहे याचे स्पष्टीकरण त्यांनी गटबाह्य व गटांतर्गत विवाहाच्या संदर्भात केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''गटांतर्गत विवाह करणाऱ्या रूढीने स्वगटाबाहेर लग्न करण्याच्या रूढीवर मिळविलेला विजय म्हणजे जातीची निर्मिती होय.'' स्त्रियांच्या लैंगिकतेवरील नियंत्रणात जातिव्यवस्थेचा उदय असल्याचे त्यांचे स्पष्ट मत होते. या जातिनिर्मितीचा सिद्धान्त डॉ. आंबेडकरांनी सोदाहरण देऊन स्पष्ट केला आहे. समजा, एखाद्या लोकसमूहात गटबाह्य विवाहपद्धती रूढ असेल तर त्या गटाला जातीत रूपांतरित होण्यासाठी गटांतर्गत विवाहाची अट घालावी लागेल. परंतु, आपल्या गटाबाहेरच्या लोकांशी लग्न करू नका असे केवळ फर्मान काढून हे काम होण्यासारखे नाही. कारण, इतर लोकसमूहांमध्ये मिसळून जाण्याची प्रवृत्ती मानवी समूहात असते या प्रवृत्तीला पायबंद घालून लोकांना ओलांडताच येणार नाहीत अशा मर्यादा घातल्या जातात व मग गटाबाहेर लग्नविषयक व्यवहार होऊ नयेत असे सांगितले जाते. परंतु, गटांतर्गतच विवाह करायचे बंधन घातले तर त्या गटात काही कठीण समस्या निर्माण होतात म्हणजे सर्वसाधारणत: प्रत्येक लोकसमूहातील स्त्री-पुरुषांची विभागणी समसमान असते. स्त्री-पुरुषांचे प्रयत्न कमी-जास्त (असमान) झाले तर गटाबाहेर विवाह करावे लागतील. गटबाह्य विवाह झाल्यास गट बंदिस्त होणार नाही म्हणून हे प्रमाण व्यस्त होऊ नये म्हणून काही उपाय योजले जातात, ते असे :

१. **सतीप्रथा :** पतीच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी ही जिवंत जाळली जाऊन स्त्री-पुरुषांची समान संख्या ठेवण्याचा प्रयत्न केला जाई. कारण, पतीच्या निधनानंतर ती स्त्री 'वाढीव स्त्री' ठरते. परंतु, स्त्री-पुरुषांच्या संख्येतील तफावत नष्ट करण्याचा सतीप्रथा हा काहीसा अव्यवहार्य मार्ग आहे. पतीच्या निधनानंतर पत्नीस जाळून मारून टाकण्याचा उपाय का आला? तर ती स्त्री, विधवा म्हणून जिवंत राहिली तर एक परजातीतील पुरुषाशी विवाह करील याकडे गटांतर्गत दुसऱ्या पुरुषाशी विवाहबद्ध झाली तर त्या जातीतील स्त्रियांमध्ये स्पर्धा सुरू होईल आणि लग्न न झालेल्या मुलींच्या लग्नविषयक राखीव हक्कांवर आक्रमण होईल म्हणून तिची व्यवस्था कशी लावावयाची याचे इतरही मार्ग शोधले गेले.

२. **वैधव्य लादणे :** वैधव्य सक्तीने लादल्यामुळे ती स्त्री जिवंत राहते आणि दुसऱ्या पुरुषाशी विवाहही करू शकत नाही, परंतु इथेच न थांबता तिचा मोह कोणा पुरुषास होऊ नये म्हणून तिचे विद्रूपीकरण केले जाई. उदा. - तिचे केस कापणे, जाडी-भरडी वस्त्रे नेसायला देणे, बंदिस्त खोलीतच वास्तव्य करावयास भाग पाडणे, इ.

एखाद्या लोकसमूहात जशा स्त्रिया वाढीव करू शकतात, तसेच पत्नी मेल्यानंतर पुरुषही वाढीव ठरतात. मात्र प्राचीनकाळापासून समाजव्यवस्थेत स्त्रियांपेक्षा पुरुषांना वरच्या दर्जाचे स्थान दिले गेले आहे. म्हणून डॉ. आंबेडकर पुढे असे म्हणतात की, ते केवळ पुरुष आहेत म्हणून त्यांना जिवंत जाळले जात नाही. पुरुष हा जात टिकविण्यासाठी उपकारक मानला जातो म्हणून वाढीव ठरलेल्या पुरुषांची व्यवस्था दोन प्रकारे लावली जाते :

अ) **विधुरांवर ब्राह्मणचर्यावस्था लादणे :** अशा वाढीव पुरुषास जातव्यवहारातून अलिप्त ठेवून संन्यास भाग पाडले जाई. परंतु कोणत्याही जातीला इतर जातीशी स्पर्धा करताना संख्यात्मक वाढही महत्त्वाची असते, म्हणून जातीचे संवर्धन करण्यात पुरुष ब्रह्मचारी असून कसे भागेल? म्हणून गृहस्थावस्थेत ठेवले जाते. मग त्याला वधू कशी मिळणार?

**ब) लग्नायोग्य नसलेल्या अल्पवयीन मुलींशी लग्न :** जातीतल्या जातीत वधूची व्यवस्था करण्याचा प्रश्न वाढीव पुरुषासंदर्भात निर्माण होतो. स्त्री-पुरुषांची संख्या समान असल्यामुळे एका पुरुषाने एकाच स्त्रीशी लग्न (विवाह) करण्याची संधी असते. अशा परिस्थितीत वाढीव पुरुषाला जातीत जखडून टाकायचे असेल तर त्याला केवळ लग्नायोग्य न झालेल्या वयोगटातील मुलगीच वधू म्हणून पुरविली जाऊ शकते.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, ''मूलतः या रूढी अतिरिक्त पुरुष व स्त्रिया यांचा प्रश्न सोडविण्याच्या हेतूने आणि जातिअंतर्गत विवाहाची रूढी शाबूत ठेवण्याच्या उद्देशाने अस्तित्वात आल्या.'' एकंदरीत या विश्लेषणामधून एक महत्त्वाचा सिद्धान्त डॉ. आंबेडकरांनी मांडला आणि तो म्हणजे 'स्त्रिया' या जातिव्यवस्थेचे प्रवेशद्वार आहेत.' आजवरच्या जातिव्यवस्थेच्या निर्मितीची, वैशिष्ट्यांची जी चर्चा झाली ती मुख्यतः मांसभक्षण, विटाळ किंवा प्रायः धर्माच्या अंगाने झाली. परंतु, बाबासाहेबांच्या विचारांचे वैशिष्ट्य आहे की, त्यांनी प्रथमतः जातिव्यवस्था ही स्त्रीशोषणातून निर्माण झाल्याचे प्रतिपादन केले आहे. स्त्रियांच्या लैंगिक शोषणातून जात, अधिकाधिक बंदिस्त केल्याचे ते सतीची रूढी, बालविवाह, स्त्रियांचे विद्रूपीकरण, इत्यादींतून दाखवून देतात. पुढे ते म्हणतात की, एकूण लोकसंख्येचा किती भाग या दोन (स्त्री आणि शूद्र) शब्दांनी व्यापला आहे? स्त्री ही लोकसंख्येचा निम्मा भाग आहे आणि उरलेल्यांत शूद्र हे २/३ पेक्षा कमी नाहीत. हे दोघे मिळून एकंदर लोकसंख्या ७५% आहेत. या प्रचंड लोकसंख्येवर ब्राह्मणशाहीने कायमचे दास्य आणि अधोगामी अवस्था लादली आहे. ७५% लोकांना '' सक्तीने या अवस्थेत ठेवल्यामुळेच त्यांचे जीवन, स्वातंत्र्य आणि सुखाचा मार्ग आक्रमणाचा हक्क नाकारल्यामुळेच भारत हे एक विनाशप्रत पोहोचलेले जवळजवळ मृतवत राष्ट्र बनले. (ब्राह्मणशाहीचा विजय, पृष्ठ क्र. ५५)

'मनुस्मृती'ने विवाहबंदीच्या आधारे समाजजीवनाच्या सर्व अंगांची शकले केली आहेत असे बाबासाहेब म्हणतात. मनूने उच्च-नीचतेच्या पायऱ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रासाठी स्पष्ट केल्या आहेत :

१. विवाह : शूद्र स्त्रीच शूद्राची पत्नी होऊ शकते.
२. अतिथी स्वागत: ब्राह्मणाच्या घरात येणाऱ्या क्षत्रियाला अतिथी म्हणत नाहीत.
३. संस्कार : शूद्रांना पवित्र संस्कारांचा अधिकार नाही.
४. कायदे न्याय : क्षत्रियाने जर ब्राह्मणाची बदनामी केली तर १०० पण दंड करावा, वैश्याला १५० पण, याच अपराधाबद्दल शूद्राला देहदंड.
५. स्वातंत्र्य : स्त्रियांना विवाह, घटस्फोट, मालमत्ता, पुनर्विवाहाचे स्वातंत्र्य नाही.

भारतीय समाजाची ही वास्तवता डॉ. आंबेडकरांनी अत्यंत भेदकपणे समोर आणली.

जातिव्यवस्था आणि स्त्रीदास्याचा संबंध दर्शविणारा मुद्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महाड सत्याग्रहापुढील भाषणातूनही स्पष्ट होताना दिसतो. परिषदेत सहभागी झालेल्या अस्पृश्य स्त्रियांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. ते विचारतात – तुमच्यापोटी जन्म घेणे पाप का ठरावे ? उत्तर—अर्थातच त्या दलित, अस्पृश्य आहेत आणि त्यांच्यापोटी केवळ मूल जन्मत नाही तर अस्पृश्य म्हणून मूल जन्मते हे डॉ. आंबेडकरांना सांगायचे आहे. डॉ. आंबेडकर असे म्हणतात, खरे म्हटले असता अस्पृश्यता निवारण्याचा प्रश्न पुरुषांचा नसून स्त्रियांचाच आहे. तुम्ही आम्हां पुरुषांना जन्म दिलेला आहे. आम्हांला इतर लोक कसे जनावरांपेक्षाही कमी लेखतात. काही ठिकाणी आमची सावलीसुद्धा घेत नाहीत. इतर लोकांस कोर्टकचेऱ्यांमध्ये नाना सन्मानाच्या जागा मिळतात. परंतु तुमच्यापोटी जन्मलेल्या आम्हां मुलांना पोलीस खात्यातील शिपुर्ड्याचीही नोकरी मिळत नाही. इतका आमचा दर्जा आहे. या सभेस बसलेल्या कायस्थ व इतर अस्पृश्य बापांच्या पोटी जन्मलेल्या मुलांमध्ये व आम्हां मुलांत काय अंतर आहे? असे असताना ब्राह्मण स्त्रीच्या पोटी जन्मलेले बालक का सर्वसामान्य व्हावे व तुमच्या पोटी जन्मलले बालक सर्व ठिकाणी का अवमानिले जाते? त्याला साध्या माणुसकीचा हक्क का असू नये? तुमच्यापोटी जन्म घेणे पाप का ठरले जावे ? असे हृदयद्रावक प्रश्न ते विचारतात आणि जातिव्यवस्था जन्मजात असल्याचे सांगतात. त्यातून (१) जातिव्यवस्था स्त्रियांचे कशा

प्रकारे शोषण करते, (२) स्त्रिया जातिव्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहेत, (३) जातिअंताच्या लढ्यात स्त्रियाच पुढाकारावर असतील, हे त्यांनी स्पष्ट केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय स्त्रीदास्याचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' या आपल्या महत्त्वपूर्ण निबंधात त्यांनी ब्राह्मणी संस्कृतीने स्त्रियांना कसे हीन लेखले, स्त्रियांवर बंधने कशी लादली याचे विश्लेषण केले आहे. 'राम-कृष्णाच्या गौडबंगाल'मध्ये डॉ. आंबेडकर नमूद करतात - एक व्यक्ती म्हणून रामाबद्दल बोलताना मी फक्त दोन गोष्टींचा उल्लेख करीन - पहिली, रामाने वालीशी केलेले वर्तन आणि दुसरी स्वत:च्या पत्नीला, सीतेला दिलेली वागणूक. ('राम-कृष्णाचे गौडबंगाल', पृष्ठ क्र. ७) बौद्ध परंपरा स्त्री-पुरुष समता सांगणारी वर्णव्यवस्थाविरोधी परंपरा होती. उलट, हिंदू धर्म परंपरा साधे मुलगी जन्माला येणे हेदेखील मागील जन्मीचे पाप मानते. आपले हे म्हणणे डॉ. आंबेडकरांनी बौद्ध वाङ्मयातील राजा प्रसेनजीत यांच्या कथेतून स्पष्ट केले आहे.

गौतम बुद्धाच्या भिक्षू संघात स्त्रियांना प्रवेश होता. ब्राह्मणी परंपरेने मात्र स्त्रियांना ज्ञानार्जनास बंदी घातली होती. त्यांना आध्यात्मिक अधिकार नाकारले. मोक्षप्राप्ती नाकारली. संन्यास घेण्यास नाकारण्यात आला. वेदपठण करण्याचा, ऐकण्याचा अधिकार स्त्रिया व शूद्रांना नाही असे 'मनुस्मृती'ने सांगितले. त्यांना धर्माचे शिक्षण घेण्यास मज्जाव करण्यात आला. मात्र धर्मशास्त्र सांगते की, वैदिक मंत्र उच्चारले तरच पाप नष्ट होते. म्हणजे, स्त्रियांना व शूद्रांना वेदांचा अधिकार नाकारून पापापासून मुक्त होण्याची संधीच नाकारलेली आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, ब्राह्मणी विचारपरंपरेचे स्त्रीविषयक धोरण म्हणजे भारतातील स्त्रीवर्गाचा उपमर्द आणि विनाश करणारे आहे. ज्ञानार्जन करण्याचा अधिकार सर्व मानवांस असला पाहिजे. मात्र कोणतेही सयुक्तिक कारण न देता ब्राह्मणी संस्कृतीने ज्ञानार्जनाचा अधिकार स्त्रियांपासून हिरावून घेतला आहे. सारांश, ब्राह्मणी कुटिल नीतीमुळे स्त्रिया आध्यात्मिक ज्ञानार्जनाच्या अधिकारापासून वंचित झाल्या आहेत, असे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात. ते पुढे असेही म्हणतात की, ब्राह्मणी छावणीने ज्ञानार्जनाच्या संदर्भात स्त्रियांवर केलेले दोन प्रमुख

अन्याय गौतम बुद्धांनी दूर केले आहेत. ते म्हणजे, बुद्धांनी स्त्रियांना परिव्रज्येचा अधिकार मान्य केला होता. परिव्रज्या म्हणजे धम्मदीक्षा ! म्हणून, डॉ. आंबेडकर म्हणतात की, गौतम बुद्धाने भारतातील स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त केले. त्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणली.

स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्यत्रयी बाबासाहेबांच्या चिकित्सेचा पाया होती. स्त्री-पुरुष समता व जातिविरहित समाजरचना हा त्यांचा आदर्श होता. म्हणून, इतिहासकाळात स्त्रीचे स्थान नेमके काय होते व ते कसे बदलत गेले याचा शोध त्यांनी घेतला. जातिव्यवस्था व मनुप्रणीत कायद्यांनी स्त्री-समूहाला अवनत अवस्थेला आणून ठेवण्याचे ऐतिहासिक पुराव्याच्या आधारे त्यांनी मांडले. स्त्रीदास्याच्या आकलनासाठी त्यांचे हे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याचप्रमाणे यापुढे भारताच्या संदर्भात स्त्री सबलीकरणाविषयी विचार मांडताना आपल्याला त्या वारशाचा संदर्भ घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे स्त्रिया हा कोटिक्रम एकजिनसी नाही हे अधोरेखित करण्यासाठी गरजेचे आहे.

❑❑

# ४ महिला सबलीकरण आणि समकालीन संदर्भ

भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ नुसार सर्व व्यक्ती कायद्यासमोर समान आहेत. कलम १५ नुसार जात, धर्म, लिंग इत्यादींच्या आधारे नागरिकांत भेदभाव केला जाणार नाही. तर १६ व्या कलमानुसार शैक्षणिक पात्रता असणाऱ्या स्त्री-पुरुषांस शासनात कोणतेही पद प्राप्त करता येईल. या हक्कांमुळे स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रांत वावरताना दिसतात. स्त्रियांना राजकारणात सहभाग घेण्याचा, मतदान करण्याचा आणि निवडणुकीला उभे राहून निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

भारतीय उपखंड व पूर्व आशियाकडे पाहिले की, समानतेच्या लढाईतही काही महिलांनी विशेषत: राजकीय क्षेत्रात भरारी मारलेली दिसते. दिवंगत बेनझीर भुट्टो पाकिस्तानच्या पंतप्रधान होत्या. आज चंद्रिका कुमारतुंगा श्रीलंकेच्या अध्यक्ष असून फिलिपिन्समध्ये ओरोयो अध्यक्षा झाल्या आहेत. इंडोनेशियातील संभाव्य राजकीय बळानंतर देशाची सूत्रे उपाध्यक्षा मेगावर्ती सुकार्णी यांच्या हाती जातील. म्यॉनमारमध्येदेखील महिलांच्या हाती सत्ता आहे.

भारतात म. फुले यांनी स्त्री-शिक्षणाची चळवळ सुरू केल्यामुळे आज स्त्री-साक्षरतेचे प्रमाण वाढले. स्त्रिया आज प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा प्रभावीपणे उमटवीत आहेत. श्रीमती इंदिरा गांधी ह्या १४ वर्षे भारताच्या पंतप्रधान होत्या, श्रीमती सरोजिनी नायडू, राज्यपाल, नुकत्याच मुख्यमंत्री झालेल्या कु. मायावती, कु. ममता बॅनर्जी, कु. उमा भारती, श्रीमती सुषमा स्वराज, श्रीमती सोनिया गांधी इ. स्त्रियांनी राजकारणात आपला ठसा उमटविला आहे. तर प्रशासकीय सेवेत/क्षेत्रात श्रीमती अण्णा चंदी (न्यायाधीश, केरळ), श्रीमती कार्नेलिया सोराबजी (बॅरिस्टर), श्रीमती विजयालक्ष्मी पंडित (युनोच्या अध्यक्षा), श्रीमती किरण बेदी (पहिल्या आय.पी.एस.अधिकारी), श्रीमती रूपन बजाज, श्रीमती श्यामला शुक्ला, फातिमा बेबी, इ. अनेक नावे भारतातील राजकीय व प्रशासकीय क्षेत्रांत हिरिरीने सहभागी होऊन कार्यरत असलेल्या स्त्रिया सांगता येतील.

अर्थात, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रांत जरी स्त्रिया कार्यरत असल्या तरी एकूण स्त्री-संख्येच्या तुलनेत तो सहभाग अत्यंत नगण्य व अतिअल्प आहे. कारण, स्त्रियांची लोकसंख्याही एकूण लोकसंख्येच्या जवळपास निम्मी आहे. सहभागाबाबतीत स्त्रिया उदासीन दिसून येतात. परंतु, लोकशाहीच्या त्यामागच्या समस्यांचा शोध घेणे येथे अनिवार्य ठरते.

**महिलांपुढील समस्या :**

भारतीय संस्कृती पुरुषप्रधान म्हणून ओळखली जाते. पुरुषवर्गाने स्त्रियांना कमी लेखून त्यांचे क्षेत्र चूल आणि मूल एवढेच बंदिस्त केले. त्यांना बुद्धी नसते. त्या दुर्बल असतात. कोमल अंत:करणाच्या असतात. म्हणून त्यांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये विकास करण्याकरिता वाव दिला जात नाही. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या आजच्या काळातदेखील महिला साक्षरतेचे प्रमाण केवळ ३५% पेक्षा कमी आहे. तसेच आजही ७२% महिला आर्थिक दृष्ट्या परावलंबी आहेत. काही स्त्रिया, पती किंवा मुलांवर अवलंबून आहेत. २८% स्वावलंबी आहेत. परंतु, तिचे सामाजिक स्वातंत्र्य एक तर तिच्या पतीने किंवा समाजाने मर्यादित केले आहे. आज महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३% जागा राखीव असल्या तरी अनेक ठिकाणी स्त्रियांना स्वतंत्रपणे राज्यकारभार करता येत नाही. त्या केवळ रबरी शिक्का (Rubber Stamp) म्हणून त्यांचा वापर होतो. पूर्वपरंपरेनुसार राजकारणात पुरुषी सत्ताकेंद्रे म्हणून पती, वडील, भाऊ, दीर, मुलगा आणि इतर नातेवाईक पडद्यामागून राजकारणाची सूत्रे हलवितात. ज्या स्त्रिया शहर, राज्य, राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात आहेत, त्यांना त्यांच्या कुटुंबातील कोणाचा तरी वारसा लाभलेला आहे, असे अभ्यासातून निष्कर्षास येते. राजकारणापेक्षा प्रशासकीय क्षेत्रात स्त्रिया पुरुषांपेक्षा तसूभरही कमी नाहीत. त्या आपल्या कार्याचा ठसा उमटवीत आहेत. प्रामाणिकपणा, काटकसर, काम पूर्ण करण्याची चिकाटी आणि सहकार्य करण्याची मानसिकता, योग्य वेळी परिस्थितीशी जुळवून घेण्याची पात्रता आणि कौशल्ये या सद्‌गुणांमुळे महिला अधिक सक्षमपणे काम करू शकतात.

लोकसभेत ‘महिला विधेयक’ अनेक वेळा चर्चेस येऊन मंजूर होऊ शकत नाही. याचे कारण स्त्रीविरोधी पुरुषी मानसिकता होय. राजकारण आणि प्रशासनात स्त्रियांचा सहभाग चांगल्या गतीने वाढत आहे. ही बाब सामाजिक आणि राजकीय सुधारणेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब आहे. पुरुषांनी वरवर स्त्रीमुक्ती चळवळीचे कितीही तोंडभरून कौतुक केले तरी पुरुषी मानसिकतेच्या अंतर्मनाचा ठाव घेतल्यास त्यांचा स्त्रीमुक्ती चळवळीला किती पाठिंबा आहे, हे तात्काळ लक्षात येते. स्त्री-पुरुष विषमता हा समाजपरिवर्तनासाठी अत्यंत कळीचा मुद्दा आहे. स्त्रिया केवळ अबला न बनविता त्यांना सबला बनविणे ही प्रत्येकाची सामाजिक आणि सामूहिक बांधिलकी आणि जबाबदारी आहे. याकरिता योग्य ते नियोजन आणि व्यवस्थापन करून कठोर अंमलबजावणी करावी लागेल. कायद्याने बदल करण्यापेक्षा पुरुषी मानसिकतेत बदल करणे आवश्यक आहे. भारतीय स्त्री ही बहीण, पत्नी, सखीपासून प्रशासकीय अधिकारी अशी कोणतीही भूमिका पूर्ण क्षमतेने पार पाडू शकते.

आजच्या जगात संस्कृती ही पुरुषप्रधान नाही व स्त्रीप्रधानही नाही तर ती अर्थप्रधान आहे, म्हणून स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी, राजकीय व प्रशासकीय सहभागासाठी त्यांना आर्थिक स्वावलंबी होणे गरजेचे आहे. असे झाल्यास कोणत्याही अधिकारी किंवा नेत्या असलेल्या स्त्रियांच्या निर्णयावर पुरुष आपले वर्चस्व गाजवू शकणार नाहीत. साक्षरता आणि आर्थिक विकास, स्वावलंबन अधिक महत्त्वाचे आहे.

सारांशाने, महिलांच्या समस्यांबाबत ग्रामीण भागांतील महिलांचे प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत - मुलींच्या जन्माचे स्वागत नाही, मुलगा हाच वंशाचा दिवा, स्त्रियांमध्ये शिक्षणाचा अभाव, अंधश्रद्धा, आरोग्याचा प्रश्न, आर्थिक स्वातंत्र्याचा अभाव, कन्याविक्रय, वेश्याव्यवसाय, कुटुंबातील स्त्रीचे स्थान आणि पती-पत्नीतील अंतर, स्त्रीचारित्र्याचा संशय, लैंगिक छळ, इत्यादींवरील प्रश्नांना आजही ग्रामीण भागांतील स्त्रियांना सामोरे जावे लागत आहे. एका मोठ्या समूहाच्या उत्पादनासाठी देशातील सर्व सुजाण, अभ्यासू कार्यकर्ते आणि धोरणात्मक समाजविकासाबाबत निर्णय घेणारे राज्यकर्ते आणि त्यांची अंमलबजावणी करणारे कार्यक्षम प्रशासक यांच्यामध्ये समन्वय घडवून महिला विकास प्रश्न मार्गी लावणे अत्यंत आवश्यक आहे.

१९ व्या शतकात युरोपमध्ये औद्योगीकरण झपाट्याने वाढू लागले आणि पुरुषांबरोबर महिलाही या प्रवाहात सामील झाल्या. परंतु, हजारो वर्षांच्या परंपरेनुसार महिलांना दुय्यम स्थान मिळाले आणि पुरुषांप्रमाणे समान वेतन व समान सुविधांपासून त्यांना वंचित राहावे लागले. शिकागोमध्ये १८५७ मध्ये महिला कामगारांनी पुरुषांबरोबर समान वेतन मिळावे व कामाचे तास कमी व्हावेत याकरिता संप पुकारला होता. या लढ्याची आठवण म्हणून १९१० पासून ८ मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय महिलादिन' म्हणून जगभर साजरा होत आहे. महिला विकासात आर्थिक विकास हा महत्त्वाचा असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना १९७५ मध्ये केली. कालांतराने १९७९ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने महिलांबाबत भेदभाव दूर करणे, त्यांना समान दर्जा देणे यांबाबतचा ठराव केला. परंतु, भारताने यापूर्वीच ७३ वी, ७४ वी घटनादुरुस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी १/३ आरक्षण ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. महाराष्ट्र हे अत्यंत पुरोगामी राज्य असल्यामुळे या सर्व घडामोडींचा सकारात्मक परिणाम झाला आणि जून १९९४ मध्ये महाराष्ट्रात पहिले महिला धोरण जाहीर केले. महाराष्ट्र हे महिला धोरण जाहीर करणारे भारतातील पहिले राज्य होय. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने महिलांचे प्रश्न ऐरणीवर आले व त्यांच्या सोडवणुकीची वाटचाल सुरू झाली. तथापि, १९७५ पासून दोन दशकांत प्रश्न सोडविण्याचे काहीसे उपचारात्मक होते. परंतु १९९४ च्या धोरणात महिलांच्या मूलभूत प्रश्नांना हात घालण्यात आला. उदा., मालमत्तेत तिला हक्कदार बनविण्यात आले. वडिलांबरोबर आईचे नावही बंधनकारक झाले. त्यामुळे महिलेस सामाजिक दर्जा प्राप्त झाला. मानवी हक्कांसंबंधीच्या जागतिक परिषदेतील व्हिएन्ना जाहिरनाम्यात समाविष्ट केलेल्या मूलभूत तत्त्वांचा या धोरणात अंतर्भाव आहे. १९९४ च्या धोरणात तातडीने लक्ष पुरवावयाच्या बाबींमध्ये महिलांविरोधी अत्याचारांचे निर्मूलन करण्यासाठी पावले उचलणे, प्रकट व अभिप्रेत अशा दोन्ही स्तरांवर कायदेशीर समान हक्कांची प्रस्थापना करणे, स्थानिक स्वराज संस्थांमध्ये आणि सहकारी संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे, या बाबींवर विशेष भर देण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाने आखलेले महिला धोरण हे महिला विकासाच्या दिशेने टाकलेले प्रथम पाऊल होते.

स्वातंत्र्योत्तर ४५ वर्षांच्या अनुभवानंतर ज्या त्रुटी लक्षात आल्या आणि त्यांवर जे उपाय सुचले त्यांचा आधार घेऊन हे धोरण आखण्यात आले होते. ही एक क्रांतिकारी पर्वाची आणि प्रक्रियेची सुरुवात होती. परंतु हे धोरण म्हणजे महिला विकासाच्या क्षेत्रातील पहिला अध्याय होता. १९९४ च्या धोरणात असा निर्णय घेण्यात आला की, दर तीन वर्षांनी या धोरणांतर्गत घेतलेल्या निर्णयांची फेरतपासणी करून त्यांत आवश्यकतेनुसार बदल घडवून आणण्याकरिता सुधारित धोरण जाहीर करावे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजकल्याणाच्या अनेक योजना आखण्यात आल्या व योजनांचे लाभ महिलांनाही मिळतील अशी अपेक्षा होती. परंतु, तसे घडले नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी आपण स्वतंत्र यंत्रणा उभारणार नाही व स्वतंत्र कार्यक्रम आखणार नाही तोपर्यंत व्यापक प्रमाणावर महिलांना लाभ मिळणार नाहीत, हे लक्षात आल्यामुळे १९९३ मध्ये 'महिला व बालविकास' या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली. कालपर्यंत स्त्रीबाबतचा दृष्टिकोन प्रामुख्याने 'कल्याणकारी' होता. स्त्रियासुद्धा पुरुषवर्गाप्रमाणेच विकासप्रक्रियेतील भागीदार आहेत असे न मानता त्यांना शासनयंत्रणेच्या औदार्याचा एक गरजवंत घटक असे मानण्यात येत होते. हळूहळू कल्याणकारी कल्पनेची जागा विकसनशील दृष्टिकोनाने घेतली व सहाव्या पंचवार्षिक योजनेत बदलाची प्रक्रिया गतिमान झाली. स्त्रियांची प्रतिमा व आत्मविश्वास वाढविण्याच्या गरजेकडे लक्ष वेधण्यात आले. याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने 'महिला व बालकल्याण' विकासाचे नाव बदलून 'महिला व बालविकास' असे ठेवले. शासकीय यंत्रणा कल्याणकारी दृष्टिकोन ठेवत नसून विकासात्मक कार्यावर भर देणार आहे हे यातून सूचित होते.

विकसनशील दृष्टिकोनावर आधारित अशी ही नवीन संकल्पना मांडण्यात आली असली तरी आजतागायत स्त्रियांसाठी वेगळे प्रयत्न, तसेच न्याय्य गरजांची दखल घेण्याच्या दृष्टीने शासकीय यंत्रणा आणि यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टिकोनातून बदल घडवून आणण्याचे कार्य अद्याप पूर्ण झालेले नाही. जोपर्यंत यंत्रणेचा दृष्टिकोन व्यापक होत नाही आणि स्त्रियांचे नियोजन आणि पर्यायप्रक्रियेतील सहभाग वाढत नाही तोपर्यंत विकासाची प्रक्रिया जोर धरणार नाही.

मागील दशकात बचत गटाची संकल्पना उदयास आली. प्रथमतः, याचे स्वरूप आर्थिक विकासापुरतेच मर्यादित होते. परंतु, कालांतराने या संकल्पनेचा विकास होत गेला व सहभागाची संकल्पना उदयास आली. आर्थिक विकास आणि सामाजिक अभिसरण या कल्पनांचा विकास होऊन ग्रामविकासात महिला सहभागी होऊ शकतात, नियोजन व निर्णयप्रक्रियेत भाग घेऊन त्या नियोजनाची दिशा बदलू शकतात हे सिद्ध झाले आहे. आता तर प्रत्येक योजनेत स्वयंसहायता बचतगट हा महिला विकासाच्या कार्यक्रमाचा पायाच ठरलेला आहे. जितका पाय भक्कम तितकी इमारत मजबूत होते. स्वयंसहायता बचतगट हे महिला विकासाचे सशक्त माध्यम म्हणून सिद्ध झाले असून महिला आर्थिक असो, सामाजिक विकास असो त्याची सुरुवात स्वयंसहायता बचत गटापासूनच होते. बचत गटाचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन महिला धोरण २००१ चा आराखडा तयार करताना स्वयंसहायता बचत गटावर आधारित विकासाच्या योजनांना ठळक महत्त्व देण्यात आले आहे. ग्रामीण भागात बचत गटाच्या माध्यमातून महिला एकत्र येतात. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीचा फायदा घेऊन महिला पंचायतराज्य ते पंचायतीपर्यंतचा प्रवास सुकर होत नाही तोपर्यंतच्या राजकारणात व प्रशासनात महिलांच्या सहभागाची संकल्पना महिला धोरणात मांडण्यात आली आहे. स्वयंसहायता बचत गटाकडून महिला ग्रामसभेत, महिला ग्रामसभेकडून ग्रामसभेत आणि ग्रामसभेकडून ग्रामपंचायतीत असा प्रवास सहज शक्य असून या क्रमाने महिलांना ग्रामविकासात आणि राजसत्तेत भागीदार होता येईल. नियोजन हे गल्लीपासून दिल्लीपर्यंत आणि समूहकृती संगम (Convergence) हे दिल्लीपासून गल्लीपर्यंत राबविण्यावरच खऱ्या अर्थाने नियोजनात लोकांचा सहभाग घडून येईल आणि खऱ्या अर्थाने योजना लोकाभिमुख होऊन महिला सबलीकरणात सशक्ती प्राप्त होईल. महिला सबलीकरणाची राजकीय सहभागाबरोबरच शिक्षण ज्यामधून ज्ञानाच्या क्षेत्रात आणि व्यक्तीच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा असा निर्देशक मानला जातो. ज्याचा आढावा पुढील विभागात आपण घेऊ.

❑❑

५

# महिला आणि विकास

शिक्षण ही संकल्पना जेव्हा आपण वापरतो तेव्हा त्याच्यामध्ये कुटुंबाचा दर्जा सुधारणे, वाढविणे, त्या दृष्टीने साक्षरता चळवळीमध्ये सहभागी झालेल्या महिला व त्यांच्यात झालेली जाणीवजागृती या दृष्टीने विचार केल्यास असे दिसून येते की, त्या कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत फरक झालेला आहे. तसेच, आई निरक्षर असल्याने तिच्या मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत फरक झालेला आहे. कारण, आई निरक्षर असल्याने तिला मुलांच्या शिक्षणाचे महत्त्व कळत नव्हते. परंतु, साक्षरतावर्गात आल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व कळले. मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देणे, अभ्यास वेळेवर घेणे, मुलांना अभ्यासासाठी बसविणे, पालकसभेला शाळेत हजर राहणे या गोष्टी निदर्शनास आलेल्या आहेत. म्हणूनच असे म्हणावे लागते की, महिलांसाठी राबविला जाणारा साक्षरता कार्यक्रम आणि मुलांसाठी राबविला जाणारा प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम यांमध्ये कोणत्याही प्रकारचा विराधोभास नाही, तर प्राथमिक शिक्षण व प्रौढ शिक्षण हे दोन्ही कार्यक्रम एकमेकांना पूरक आहेत.

स्थानिक भागांत, विशेषत: ग्रामीण भागांत प्राथमिक शिक्षण चौथीपर्यंत असते, त्यानंतरच्या शिक्षणाची व्यवस्था तालुक्याच्या ठिकाणी असलेली आढळून येते. ग्रामीण भागांतील पालकांमध्ये अजूनही मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणाच्या दर्जाबाबत फरक केला जातो. मुलगा चौथी वा सातवीपर्यंत गेल्यानंतर तो दूरवर असणाऱ्या शाळेमध्ये पायी जाऊन-येऊन शिक्षण घेत असतो, परंतु मुलींना मात्र बाहेरगावी जाऊन-येऊन शिक्षणासाठी पालक पाठवितातच असे नाही. मुलगा वयात आला तरीही त्याचे पालक तालुक्याच्या ठिकाणी पाठवित नाहीत. त्यामुळे मुलींची कोणतीही चूक नसताना केवळ मुलगी वयात आली आहे एवढ्याच सबबीवर चारित्र्याच्या नावाखाली बऱ्याचशा मुलींचे शिक्षण थांबविले जाते. त्यामुळे शिक्षणामध्ये गळतीचे (Drop-out) प्रमाण वाढते. काही दिवसांनी सराव नसल्याने अशा मुलींचा समावेश हा नवसाक्षर महिला या सदराखाली होतो.

प्रौढ शिक्षण कार्यक्रमांत केवळ साक्षरता ही संकल्पना नाही तर साक्षरोत्तर कार्यक्रम व निरंतर शिक्षण यांचाही संबंध आहे. त्यामुळे गळती झालेल्या मुलींचे शिक्षण अनौपचारिक किंवा प्रौढ शिक्षण कार्यक्रमांतून शिक्षणाची संधी मिळाली तर आत्मविश्वासाने पुन्हा मुली, नवसाक्षर महिला उभारू शकतात. अशा उपेक्षित समाजामध्ये महिलांमध्ये निरक्षरता अधिक आहे. जिथे निरक्षरता अधिक आहे तिथे गरिबी आहे. आणि जिथे गरिबी तिथे शोषण आहे. दलित महिलांचे शोषण एकंदर तीन पद्धतीने होते : एक, ती महिला आहे एवढ्या एका गोष्टीवरून संपूर्ण समाज तिला दुय्यम दर्जाची वागणूक देत आहे. तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन माणसासारखा नसतो. दोन, ती दलित आहे एवढ्या एका कारणावरून समाज दलितत्वाच्या भावनेने, नजरेने तिच्याकडे पाहत असतो. त्यामुळे दलित असल्याबद्दलचे जे तोटे आहेत ते तिच्या वाट्याला येतात. तीन, दलित समाजातील, कुटुंबातील पती हा पुरुषप्रधान संस्कृतीचा-मानसिकतेचा असतो, त्यामुळे ती एक पत्नी असते. त्यामुळे पत्नी म्हणूनही शोषण होते. ती वस्तुस्थिती जर एकदा लक्षात घेतली तर प्रौढ शिक्षण कार्यक्रमांमध्ये जो जाणीवजागृतीचा विचार आहे, त्यानुसार दलित, शोषित महिला या मोठ्या प्रमाणात प्रौढ शिक्षण कार्यक्रमांत सहभागी झाल्या तर प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम हा केवळ अ, ब, क, ड चा न राहता तो सामाजिक परिवर्तनाचा, प्रबोधनाचा कार्यक्रम होतो. भारतीय घटनेने जो समतेचा विचार सांगितलेला आहे, त्याच्याशी सुसंगत महिला नागरिक तयार होऊ शकतील. अशा अनेक महिला प्रौढ शिक्षण कार्यक्रमांत सहभागी होताना दिसून येतात आणि परिवर्तनाच्या कार्यांत सहभागी होऊन त्या आत्मविश्वासाने आपल्या समस्यांविषयी बोलू लागतात, हे अनुभव आहेत.

प्रौढ शिक्षण कार्यक्रमांची ज्याप्रमाणे साक्षरता, जाणीवजागृती आणि कार्यात्मक साक्षरता ही उद्दिष्टे आहेत, त्याप्रमाणे आर्थिक जीवनमान सुधारणे हेही उद्दिष्ट आहे. प्रौढ शिक्षणवर्गांतून महिला बचत गट स्थापन केला जातो. स्वत:च्या मजुरीतून पैसा एकत्रित जमा करून फंडातून गरजेप्रमाणे कर्ज घेऊन महिला जीवनातील अडचणी सोडवितात. प्रौढ शिक्षण केंद्रांतील अशा अनेक यशस्वी कथा आहेत. ज्यांमध्ये महिलांनी एकत्र येऊन स्वत:च्या मजुरीच्या उत्पन्नातून आर्थिक दृष्ट्या स्वत:च्या पायावर उभ्या राहताना दिसतात. याबाबतीत एक उदाहरण सांगावेसे वाटते ते असे, ''संगमनेर महाविद्यालयामध्ये

महिला विडी-कामगार काम करीत असताना त्या महिला साक्षर तर झाल्याच पण त्याचबरोबर स्वत:च्या मालकीचे घरकुल असावे हा विचार त्यांच्यामध्ये रुजला. सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक यांच्या मदतीने वर्गातील महिला विडी-कामगारांनी दर महिन्याला फंड जमा केला. त्यानंतर केंद्रीय श्रम मंत्रालयाच्या माध्यमातून योजना आखल्या. बँकेकडून कर्ज मिळविले आणि संगमनेर-नाशिक रस्त्यावर ५२ घरांचा स्वत:च्या मालकीचा कायमस्वरूपी प्रकल्प केला. या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यासाठी प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या गोदाताई परुळेकर आणि तत्कालीन राज्यपाल आय. एच. लतीफ हे उपस्थित होते. त्यांनी या प्रकल्पाला भेट देऊन कौतुक केले.'' अशा प्रकल्पांतून महिला साक्षरतेबरोबरच स्वत:चा पर्यायाने कुटुंबाचा आर्थिक विकासही साधलेला दिसून येतो.

साक्षरता हा कार्यक्रम केवळ निरक्षरांसाठीच आहे असे नव्हे तर बहुसंख्य समाज जे शोषित आहेत, उपेक्षित आहेत अशा समाजांसाठी हा कार्यक्रम आहे. कारण, जो तळागाळातील समाज आहे, जो शोषित आहे अशा समाजातच निरक्षरतेचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. अशा उपेक्षित समाजातील व्यक्ती निरक्षर नसते तर ती निरक्षरतेबरोबर गरीबही असते आणि म्हणूनच असे म्हणावे लागते की, गरिबी आणि निरक्षरता या एकाच प्रश्नाच्या दोन बाजू आहेत. भारतीय घटनेप्रमाणे समतेचा विचार समाजात रुजवायचा असेल तर तळागाळातील समाजाला आहेरे वर्गाबरोबर समाजाला आणावेच लागते. अशा उपेक्षित मागासवर्गीय समाजातसुद्धा पुरुषांपेक्षा महिलांमध्ये निरक्षर महिलांचे पती-पत्नीमध्ये येणे हा विचार महत्त्वाचा आहे. पूर्वी मुलगा व मुलगीच्या आहारातसुद्धा फरक करतानाचे दिसून येते. आता मुलगा-मुलगी असा फरक न करता 'समान आहार—समान आरोग्य' अशी समानतेची संधी देताना दिसून येतात. याबरोबरच मुलींमध्ये कुपोषणाचे प्रमाण कमी होऊन मुले-मुली असा भेदभाव न करता शाळेमध्ये शिकण्यासाठी पालक म्हणून आपली भूमिका योग्य तऱ्हेने बजावतात, असाही अनुभव आहे. सदर विचारांवर आधारित साक्षरता संचाच्या अभ्यासक्रमांमध्ये असे पाठ टाकले गेले पाहिजेत की ज्यांमुळे योग्य संदेश नवसाक्षर प्रौढांपर्यंत पोहोचू शकतील. त्यासाठी मुद्दाम म्हणून जुन्या पुराणांतील कथा न सांगता, नव्या सामाजिक व्यवस्थेनुसार लिंगभेद न करता, आधुनिक विचारांतील धडे, पाठ जर अभ्यासक्रमांत समाविष्ट केले तर त्याचा निश्चितपणे फायदा

होईल. तसेच, सामाजिक सुधारणा करणाऱ्या थोर पुरुषांच्या चरित्रांचा जर पाठांमध्ये, अभ्यासक्रमांमध्ये समावेश केला तर त्याचाही निश्चित चांगला परिणाम होऊ शकतो.

प्रौढ शिक्षण केंद्रांतील सहभागी झालेल्या आणि केंद्रांत सहभागी न झालेल्या महिला यांतील फरक जाणून घ्यावयाचा असेल तर पूर्वी नवऱ्याने ज्या उमेदवाराच्या चिन्हावर शिक्का मारावयास सांगितलेले असायचे त्याप्रमाणे मतदान स्त्रियांकडून केले जात असे. परंतु, आता स्वतः विचार करून स्त्रिया त्यांना योग्य वाटणाऱ्या उमेदवारालाच मतदान करताना दिसतात. पूर्वी मतदानाबद्दल निरुत्साहीपणा, निष्काळजीपणा असायचा, परंतु शिक्षणामुळे जाणीव झाल्याने मतदानाचे महत्त्व कळल्याचे दिसून येते. त्यामुळे एका अर्थाने, ही राजकीय साक्षरताच (Political Literacy) कार्यक्रमात आहे. लोकशाही यशस्वी करायची असेल तर अशा राजकीय साक्षरतेची गरज मोठ्या प्रमाणात आवश्यक आहे. म्हणून, प्रौढ शिक्षण कार्यक्रमांत साक्षरतेबरोबरच प्रबोधनाचे कार्यदेखील घडत असते. अशा प्रबोधनाच्या कार्यक्रमांतून भविष्यातील समाज घडत असतो.

सारांशाने असे म्हणता येईल की, वास्तव जीवनात बहुसंख्य स्त्रिया अत्यंत कमी वेतन, कमी मजुरी, किमान कौशल्य, उत्पादनाच्या जगात कमी वाव, किमान साक्षरता, कुपोषण, अनारोग्य आणि कुटुंबातील हिंसाचार यांच्या बळी असतात. त्यामुळे स्त्रियांच्या दृष्टीने समानता, समता, न्याय असलेला समाज निर्माण करणे म्हणजे खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या सबलीकरणाचा प्रयत्न करणे, विकासप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग केवळ शाब्दिक आव्हाने करून होणार. तसेच, समानतेची कल्पना यांत्रिक औपचारिकतेतून घडणार नाही याची सर्वप्रथम जाणीव म. फुले आणि डॉ. आंबेडकर यांना झाली. त्यांनी त्यांच्या सामाजिक चळवळी आणि उपक्रमांमध्ये स्त्रीप्रश्नांना अग्रस्थान दिले.

❑❑

## **संदर्भस्रोत** (References)


१. डॉ. विद्युत भागवत : 'सक्षमीकरण : संकल्पना आणि व्यवहार', महिला सबलीकरण विशेषांक, पुणे विद्यापीठ वार्ता, कार्यकारी संपादक : डॉ. धनंजय लोखंडे, वर्ष : एप्रिल २००२-मार्च २००३.

२. Nation Policy for the Empowerment of Women, 2001, Department of Woman and Child Development, Govt. of India.

३. Towards Equality the Unpublished Agenda - Status of Women in India, 2001.

४. Bagchi Joshadhara : Women's Empowerment : Paradigms and Paradoxes in From Myths to Markets, Essays on Gender, Sangari & Chakravarty (Eds.) : Manohar, 1999.

५. " Empowerment from below : Learning from the Grassworks" in Kabeer, Naila Reversed Realities, Gender Hierarchies in Development Thought, Verso : 1994.

६. Naila Kabeer & Ramaya Subramaniam : Institutions, Relations and Outcomes, Kali for Women, New Delhi, 1999.

७. डॉ. भारत पाटणकर : 'भौतिकवादी इतिहासलेखनात म. फुले यांचा स्त्रीमुक्तिवादी दृष्टिकोन' अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या दिशेने (संपादित) : विद्युत भागवत, प्रतिमा परदेशी, प्रकाशक : स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे-७, १९९८.

८. श्री. किशोर ढमाले : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रीवादी इतिहासलेखन', (लेख) अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या दिशेने (संपादित) : विद्युत भागवत, प्रतिमा परदेशी, प्रकाशक : स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे-७, १९९८.

९. डॉ. विलास आढाव : 'महात्मा फुले आणि स्त्रियांचा विकास', 'लोकमत,' पुणे, २७ ऑक्टोबर, २००२.

१०. डॉ. विलास आढाव : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला व शिक्षणविषयक विचार' (लेख) 'लोकमत', पुणे, ६ डिसेंबर, २००१.

११. प्रा. एम. बी. तौर, 'महिला सबलीकरण आणि वस्तुस्थिती' (लेख) महिला सबलीकरण विशेषांक, विद्यापीठ वार्ता, कार्यकारी संपादक : डॉ. धनंजय लोखंडे, वर्ष : एप्रिल - २००२-मार्च २००३.

१२. श्री. वासुदेव गोरडे : 'महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण, १९९४ ते २००१ : एक प्रवास, यशदा 'यशमंथन', वर्ष : २, अंक-४, वर्ष : जानेवारी-मार्च २००२, महिला विशेषांक.

१३. प्रा. तेज निवळीकर : 'महिला साक्षरता आणि विकास' याविषयी विचारविनिमय.

१४. डॉ. विलास आढाव : 'महिला साक्षरता आणि विकास' (लेख) पुणे विद्यापीठ वार्ता, कार्यकारी संपादक : डॉ. धनंजय लोखंडे, महिला सबलीकरण विशेषांक, वर्ष : एप्रिल २००२ - मार्च २००३.

* * * * *